दिनांक : .१.२०२०

**प्रति,**
**मा. गृहमंत्री,**
**भारत सरकार, नवी देहली**

**विषय : स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी काँग्रेसने प्रसारित केलेले ‘वीर सावरकर–कितने ‘वीर’ ?’ या पुस्तकावर बंदी घालणे, संबंधित लेखकावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करणे यांविषयी....**

महोदय,

भोपाळ (मध्यप्रदेश) येथे नुकतेच आयोजित केलेल्या काँग्रेस सेवादलाच्या प्रशिक्षण शिबिरात ‘वीर सावरकर–कितने ‘वीर’ ?’ या नावाने एक पुस्तक वाटण्यात आले. या पुस्तिकेत स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याशी संबंधित वेगवेगळ्या घटना, प्रश्न यांविषयी हेतूतः वाद निर्माण करण्यासाठी देण्यात आल्या आहेत. यातून देशात धार्मिक आणि जातीय तणाव निर्माण करून सामाजिक सलोखा बिघडवण्याचाही यातून कुटील हेतू असल्याची शंका येते.

**तरी या पुस्तिकेमधील लक्षात आलेल्या गंभीर गोष्टी पुढे देत आहोत....**

१. ब्रह्मचर्य ग्रहण करण्याआधी पंडित नथुराम गोडसे आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यात समलिंगी संबंध होते, असा धादांत खोटारडा, तथ्यहीन आणि निंदनीय असा दावा करण्यात आला आहे.

२. स्वा. सावरकर १२ वर्षांचे असतांना त्यांनी एका मशिदीवर दगड भिरकावल्याचा दावा या पुस्तकात केला आहे.

३. ‘स्वा. सावरकर अल्पसंख्यांकांच्या महिलांवर बलात्कार करण्यासाठी हिंदूंना उत्तेजित करत होते’, असा हेतूतः धार्मिक आणि जातीय तणाव निर्माण करणारे तथ्यहीन लिखाण यात केले आहे.

**काँग्रेसचा स्वा. सावरकरद्वेष हा क्रांतीकारक आणि राष्ट्रपुरुष यांचा अवमानच आहे, असे आम्ही मानतो. तरी हा काही पहिलाच प्रसंग नसून यापूर्वीही काँग्रेस पक्षातील कार्यकर्ते, पदाधिकारी आणि अध्यक्ष यांनी अनेकदा स्वा. सावरकर यांचा सार्वजनिकरित्या अवमान केला आहे. याची काही उदाहरणे –**

१. २१ ऑगस्ट २०१९ च्या रात्री देहली विश्वविद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्याला काँग्रेसच्या ‘नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया’ (एन्.एस्.यु.आय.) या विद्यार्थी संघटनेचा देहली अध्यक्ष श्री. अक्षय लाकडा आणि संघटनेचे अन्य देशद्रोही कार्यकर्ते यांनी चपलांचा हार घालून काळे फासले होते. ही कृती अतिशय संतापजनक आणि निषेधार्ह आहे. या प्रकरणी देहली पोलिसांनी ‘एन्.एस्.यु.आय.’च्या काही कार्यकर्त्यांना अटक केली होती.

२. काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनीही अनेकदा जाहीर कार्यक्रमांत स्वा. सावरकर हे इंग्रजींची माफी मागणारे माफीवीर होते, मी पळून जायला काय सावरकर आहे काय, अशा आशयाची विधाने केली आहेत.

२. काँग्रेसप्रणीत संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार असतांना तत्कालीन केंद्रीयमंत्री मणीशंकर अय्यर यांनी सावरकर यांनी काळ्या पाण्याची शिक्षा भोगलेल्या अंदमान कारागृहामधील स्वा. सावरकर यांच्या ओळी काढल्या.

**अनेक काँग्रेसी राज्यकर्त्यांना स्वा. सावरकर यांच्या प्रतीचा पराकोटीचा द्वेष असल्याचे दिसून आले आहे. काँग्रेसने स्वा. सावरकर हयात असतांना स्वातंत्र्यानंतरही १८ वर्षे अपमान केला आणि त्यांच्या मृत्यूनंतरही आजपर्यंत तो करतच आहे. देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून स्वा. सावरकर यांनी अनेक क्रांतीकारक घडवले. त्यांना**

**देशासाठी दोन वेळा जन्मठेपेची काळ्या पाण्याची शिक्षा सुनावली गेली, त्यातील तब्बल ११ वर्षे अंदमानात ही भयानक शिक्षा भोगली; केवळ स्वा. सावरकरच नव्हे, तर त्यांच्या संपूर्ण कुटुंबियांनी स्वातंत्र्ययज्ञात असंख्य यातना सहन केल्या. स्वा. सावरकर यांनी सांगितलेले हिंदुत्व, दिलेला स्वातंत्र्यलढा याला नैतिकतेची झालर होती, तसेच त्याला एक वैचारिक बैठक होती; म्हणून ते इतक्या वर्षांनीही राष्ट्रप्रेमी आणि हिंदुत्वनिष्ठ यांच्यासाठी पूजनीय आहेत. स्वा. सावरकरांनी देशहितासाठी आणि देशाच्या अस्मितेसाठी कधीही तडजोड केली नाही अन् राष्ट्राभिमान गहाण ठेवला नाही. तरी अशाप्रकारे महान राष्ट्रभक्ताची अवहेलना सार्वजनिकरित्या आणि सातत्याने होत आहे. कोणीही उठतो आणि त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवतो, हे अक्षम्य आणि असहनीय आहे. अशा वारंवार घडणाऱ्या घटनांतून राष्ट्रभक्त नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत होत आहे.**

*** तरी या प्रकरणी आमच्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत ...**

१. ज्या लेखकाने स्वातंत्र्यवीर सावरकर आणि पं. नथुराम गोडसे यांच्याविषयी अत्यंत चुकीची अन् अश्लाघ्य माहिती प्रसिद्ध केली आहे, त्याला तात्काळ अटक करण्यात यावी, तसेच त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा.

२. केंद्र सरकारने 'वीर सावरकर–कितने 'वीर' ?' या पुस्तकावर तात्काळ बंदी घालावी, तसेच वितरित झालेल्या प्रती परत मागवण्यात याव्यात.

३. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचाच नव्हे, कोणत्याही राष्ट्रपुरुषांचा असा होणारा अपमान कायमचा थांबवण्यासाठी शासनाने नवा कायदा बनवावा, त्यात कठोर कारवाई करण्याची तरतूद करून संबंधितांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याचीही तरतूद असावी.

४. स्वा. सावरकर यांना तत्काळ 'भारतरत्न' जाहीर करावे

आपला नम्र,

स

प

क